पुणे जिल्हा परिषद, पुणे
सामान्य प्रशासन विभाग
यशवंतराव चव्हाण भवन, 6वा मजला, कॅम्प, पुणे ४११ ००१ Email – dyceogad.zppune@gmail.com
Website – www.zppune.org

जा.क्र. जिप/साप्रवि/आस्था-८/१८४/२०२४ दि. १४/०२/२०२४

# सुचनापत्र

विषय :- अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी समुपदेशनास उपस्थित रहाणेबाबत ......

संदर्भ :-१. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. अकंपा १२१७/प्र.क्र. १०२/८ दि. २१ सप्टेंबर १७
२. या कार्यालयाकडील सुचनापत्र क्र. जिप/साप्रवि/आस्था-८/४७/२४ दि. १७/१/२०२४
३. या कार्यालयाकडील सुचनापत्र क्र. जिप/साप्रवि/आस्था-८/१४१/२४ दि. ०६/२/२०२४

शासन सेवेत असतांना दिवंगत झालेल्या गट-अ ते गट-ड मधील कर्मचा-यांच्या कुटूंबातील पात्र वारसास त्याच्या शैक्षणिक अर्हतेनुसार अनुकंपा तत्वावर शासन सेवेत नियुक्तीची योजना कार्यान्वीत आहे. सदर योजनेंतर्गत पुणे जिल्हा परिषदेच्या सेवेत कार्यरत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचा-यांच्या ज्या वारसांनी दि. ३१/१२/२०२३ अखेर या कार्यालयाकडे विहित प्रस्ताव सादर केलेले आहेत, अशास उमेदवारांचे प्रस्ताव शासन निर्णयातील तरतुदीनुसार व अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांच्या पडताळणीनुसार प्रतिक्षासूचीमध्ये समाविष्ठ करुन संदर्भ क्र. (२) अन्वये प्रतिक्षासूची पुणे जिल्हा परिषदेच्या www.zppune.org या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदरच्या तात्पुरत्या प्रतिक्षासुचीमधील उमेदवारांनी त्यांच्या नावासमोरील माहितीबाबत **आक्षेप वा हरकती दि. २५/०१/२०२४** पर्यंत कागदोपत्री पुराव्यासह या कार्यालयाकडे समक्ष सादर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

तात्पुरत्या प्रतिक्षायादीबाबत प्राप्त हरकती व सुचनांचे निराकरण करुन अंतिम प्रतिक्षासुची तयार करण्यात आलेली असून सदर अंतिम प्रतिक्षासूची संदर्भ क्र. (३) अन्वये पुणे जिल्हा परिषदेच्या www.zppune.org या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली होती.

**त्यानुसार अंतिम प्रतिक्षासूचीतील सर्व उमेदवारांनी शुक्रवार, दिनांक २३ फेब्रुवारी २०२४ रोजी स. ११.०० वा. मा. शरदचंद्रजी पवार सभागृह, १ला मजला, जिल्हा परिषद इमारत, वेलस्ली रोड, कॅम्प, पुणे ०१ येथे कागदपत्रांच्या मुळ प्रतीसह समुपदेशनासाठी उपस्थित रहावे.**

मुख्य कार्यकारी अधिकारी
पुणे जिल्हा परिषद, पुणे करिता

मा. मु.का.अ., जि.प., पुणे यांचे मान्यतेनुसार

प्रती –

--------------------------

--------------------------

(अंतिम प्रतिक्षासूचीतील पात्र उमेदवार)